## थोडक्यात...

# झरी येथील नागेश देशमुख यांचा सर्वोत्तम कामगिरीबद्दल गौरव




(गजानन चव्हाण/दै.धर्मयोध्दा)

**परभणी–** भारतीय स्टेट बँकेच्या प्रादेशिक व्यवसाय कार्यालय, परभणी येथे आयोजित आढावा बैठकीत झरी (ता. परभणी) येथील श्री. नागेश विठ्ठलराव देशमुख यांचा चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्वोत्तम ग्राहक सेवा केंद्र चालक म्हणून गौरव करण्यात आला. यावेळी प्रादेशिक व्यवस्थापक श्री. दिनेश कुमार, ग्राहक सेवा केंद्र संलग्न शाखेचे व्यवस्थापक तसेच वित्तीय समावेशन व्यवस्थापक श्री. दिवाकर राव यांच्या हस्ते त्यांना गौरवचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. ग्राहकसेवा, कार्यातील सातत्य आणि उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

# चारठाणा पेठभागात चोरीचा प्रयत्न, रात्री गस्त नसल्याने नागरिकांमध्ये भीती

(बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा**-चारठाणा येथील पेठभागात गेल्या दोन–तीन दिवसांपासून अज्ञात चोरट्यांनी धुडगूस घातल्याची चर्चा आहे. रात्रीच्या वेळी काही नागरिकांच्या घरांचे दरवाजे उघडण्याचा प्रयत्न झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास काही संशयित व्यक्ती पेठभागातील घरांजवळ घुटमळताना दिसल्या. त्यांनी २–३ घरांचे दरवाजे ढकलून पाहिले. आवाज झाल्याने घरातील लोक जागे झाल्याने चोरटे पळून गेले. या घटनेमुळे पेठभागातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले घाबरली आहेत. अगोदर रात्री १२ ते ३ वाजेपर्यंत पोलिसांची गाडी गावात गस्त घालत होती. मात्र गेल्या १५ दिवसांपासून रात्री पोलिसांची गाडी दिसतच नाही. त्यामुळेच चोरट्यांचे धाडस वाढले आहे''* असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. चोरीच्या प्रयत्नामुळे परिसरातील नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पोलिस प्रशासनाकडे रात्रीची गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. या विषयावर चारठाणा पोलिस निरीक्षक बालाजी पुंड यांच्याशी संपर्क साधला असता, ''पेठभागात नियमित गस्तीसाठी गाडी पाठवण्यात येईल. नागरिकांनी घाबरून न जाता संशयित दिसल्यास तात्काळ माहिती द्यावी'' असे त्यांनी सांगितले.

# लोकसेवा आयोग परीक्षांचे बाह्य कंत्राटीकरण होणार नाही–सचिव महेंद्र हारपाळकर

( मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**बीड** -लोकसेवा आयोगाच्या केवळ पूर्व परीक्षाच ऑनलाईन पद्धतिने होणार असून, मुख्य परिक्षा सर्व ऊमेदवारांना पुर्वी प्रमाणेच ऑफ लाईन पेन व ओ एम आर शीट वर घेतल्या जातील त्या मुळे कोणत्याही स्पर्धा परीक्षा देणाऱ्या ऊमेदवारांनी भिती बाळगण्याचे कारण नाही केवळ चाळणी परीक्षा साठी लाखो ऊमेदवार अर्ज करतात त्या साठी पारदर्शक संगणक प्रणाली परीक्षा घेणे क्रमप्राप्त आहे तसेच समानिकरण हे सुत्र भारतीय सांख्यकी संस्था आय आय टी मुंबई यांचे मार्फत तयार करून घेतले असून हे सुत्र आयोगामार्फत ऊमेदवारांच्या माहीती साठी लवकरच जाहिर

स्वसुख निरभिलाष खिद्यते लोकहेतोः
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

केले जाईल असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हारपाळकर यांनी जाहिर केले आहे जलद परीक्षा व निकाल या साठी हारपाळकर यांनी केलेल्या सुधारणा बाबत परीक्षा देणाऱ्या ऊमेदवारां मध्ये समाधानाची भावना आहे परीक्षा पद्धतिचे कुठेही खाजगी करण केले जाणार नाही सर्व नियंत्रण आयोगाचे असणार आहे तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रावर कृत्रिम बुध्दीमत्ता (एआय) कॅमेरा नियंत्रण ठेवले जाणार आहे प्रत्येक परिक्षा केंद्रावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत केंद्र प्रमुख नियुक्ती केली जाणार असुन जिल्हाधिकारी यांचे संपूर्ण नियंत्रण त्या त्या जिल्हयातील परीक्षा केंद्रावर असणार आहे परीक्षा देणाऱ्या अमेदवारांच्या प्रत्येक शंकेचे निर:सरण आयोगामार्फत केले जाईल तेंव्हा परिक्षा पद्धती बाबत साशंक राहू नये असे आवाहन लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हारपाळकर यांनी केले आहे

# मानवत बसस्थानकात विद्यार्थिनींच्या हस्ते वृक्षारोपण



(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

**मानवत-** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आणि हरित भविष्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने मानवत बसस्थानकात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत १४ जुलै रोजी सकाळी विद्यार्थिनींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या संतवचनाचे स्मरण करत 'पर्यावरण समृद्धीची आणि आपली एसटी प्रगतीची' हे ब्रीद समोर ठेवून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांनी अधिकाधिक वृक्ष लागवड व संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी एसटी महामंडळाचे सहाय्यक वाहतूक निरीक्षक धोंडीराम जाधव, वाहतूक नियंत्रक परांडकर, पत्रकार संजय नाईक, प्रा. मोहन बारहाते, कचरुलाल बारहाते, मुंजा कापसे, राजू कापसे, ढालकरी यांच्यासह महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात केवळ वृक्षारोपणावरच भर न देता लावलेल्या रोपांचे संगोपन, नियमित देखभाल व संवर्धन करण्याचा संकल्पही करण्यात आला. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने आपल्या परिसरात वृक्ष लागवड करून त्यांचे जतन करावे, असे आवाहन यावेळी उपस्थित मान्यवरांनी केले. या उपक्रमामुळे बसस्थानक परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार असून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृतीसही चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# शासनाच्या निर्णयाची गेवराई शिवसेनेच्या वतीने प्रभावी अंमलबजावणी पंढरपूर वारीसाठी दिंड्यांना मोफत टोल पासचे वितरण

(दत्तात्रय शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

**गेवराई–** महाराष्ट्र शासनाने पंढरपूर आषाढी वारीसाठी जाणाऱ्या दिंड्या व वारकऱ्यांना मोफत टोल सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, त्या निर्णयाची गेवराई तालुक्यात शिवसेनेच्या वतीने प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. आवश्यक शासकीय प्रक्रिया पूर्ण करून विविध दिंड्यांसाठी मोफत टोल पास उपलब्ध करून संबंधित वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. हा उपक्रम शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे तसेच बीड जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. शासनाच्या जनहिताच्या निर्णयाचा लाभ प्रत्येक पात्र वारकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचावा, या उद्देशाने शिवसेनेच्या वतीने आवश्यक समन्वय साधून संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये शिवसेनेचे मुकेश महाजन व गणेश पवार यांनी समन्वयाची जबाबदारी पार पाडली. तसेच मोफत टोल पास संबंधित दिंड्यांपर्यंत व वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम परसराम मासाळ यांच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आले. दरम्यान, पंढरपूर वारीसाठी जाणाऱ्या कोणत्याही वारकऱ्यांना मोफत टोल पास किंवा त्यासंदर्भातील कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, गेवराई येथे संपर्क साधावा, असे आवाहन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले

# मुरूम चे महेंद्र कांबळे यांची उमरगा तालुका विधी सेवा समितीवर आधिकार मित्र म्हणून निवड

(प्रकाश शित्रे/दै.धर्मयोध्दा)

**पाथरी-** मुरूम येथील वसंत विद्यार्थी वसतिगृहाचे अधिक्षक महेंद्र भिमराव कांबळे यांची उमरगा विधी तालुका सेवा समितीवर अधिकार मित्र म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे. हि निवड राष्ट्रीय विधी सेवा समिती मुंबई यांनी निर्गमित केली असून तसे पत्र जिल्हा न्यायाधीश एम. आर. देशपांडे यांनी दिले. या निवडीबद्दल उमरगा जनता बँकचे अध्यक्ष शरण पाटील., नगराध्यक्ष बापुराव पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले निरीक्षक अमोल कांबळे, प्रा. अण्णाराव कांबळे, संतोष कांबळे, सविता मुरूमकर, रामलिंग पुराणे, नगरसेवक रूपचंद गायकवाड, डॉ. शिद्यार्थ मुरूमकर, प्रशांत मुरूमकर आदींनी अभिनंदन केले.

# स्मशानभूमीजवळ संशयास्पदरीत्या फिरणारा युवक पोलिसांच्या ताब्यात; गुन्हा दाखल

( दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

**मानवत** – शहरातील महाराणा प्रताप चौक ते पाळोदी रोड परिसरातील स्मशानभूमीच्या भिंतीलगत मध्यरात्री संशयास्पदरीत्या लपून बसलेल्या एका युवकाविरुद्ध मानवत पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १२२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस नाईक सय्यद फयाज सय्यद बाबुलाल हे शासकीय वाहनातून रात्री गस्त घालत असताना १४ जुलै रोजी पहाटे सुमारे १२.२५ वाजण्याच्या सुमारास पाळोदी रोडवरील स्मशानभूमीच्या भिंतीलगत एका झाडाच्या सावलीत एक इसम संशयास्पदरीत्या

> रात्रीच्या गस्तीदरम्यान कारवाई
> मानवत पोलिसांकडून शहरात सुरू असलेल्या रात्रीच्या गस्तीदरम्यान ही कारवाई करण्यात आली. संशयास्पद हालचालींवर पोलिसांचे बारकाईने लक्ष असून नागरिकांनीही अशा प्रकारच्या घटना निदर्शनास आल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

लपून बसलेला दिसून आला.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव भैयासाहेब सर्जेराव तुपसिंद्रे (वय ३०, रा. मांडेवडगाव, ता. मानवत) असे सांगितले. मात्र तो त्या ठिकाणी का थांबला होता याबाबत समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. तसेच ओळख पटविणारी कोणतीही कागदपत्रे त्याच्याकडे आढळून आली नाहीत. अंधाराचा फायदा घेत चोरी, घरफोडी अथवा जबरी चोरीसारखा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने तो आपली ओळख लपवून संशयास्पदरीत्या थांबलेला असल्याचा संशय पोलिसांना आल्याने त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. याप्रकरणी पोलीस नाईक सय्यद फयाज सय्यद बाबुलाल यांच्या फिर्यादीवरून मानवत पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भारत नलवाडे करीत आहेत.

# मानवतमध्ये अवैध देशी दारू विक्रीवर पोलिसांचे धाडसत्र; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

**मानवत** – मानवत शहरात अवैध देशी दारू विक्री करणाऱ्यांविरोधात मानवत पोलिसांनी धडक कारवाई करत दोन स्वतंत्र ठिकाणी छापे टाकून देशी दारूचा साठा जप्त केला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जुलै रोजी दुपारी मानवतपरभणी मार्गावरील राघवेंद्र जिनिंगसमोरील सार्वजनिक रस्त्यावर छापा टाकण्यात आला. यावेळी दीपक पांडुरंग वाघमारे (वय ३२, रा. आंबेडकर नगर, मानवत) याच्या ताब्यातून 'भिंगरी संत्रा' देशी दारूच्या १८० मिलीच्या आठ सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. जप्त मुद्देमालाची किंमत ६४० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी आठवडी बाजार परिसरातील उमेश ड्रेसेस शेजारील सार्वजनिक रस्त्यावर आणखी एक कारवाई

> अवैध दारू विक्रेत्यांवर पोलिसांचा वॉच
> मानवत शहरात सार्वजनिक ठिकाणी अवैध देशी दारूची विक्री होत असल्याच्या तक्रारी वाढत असताना पोलिसांनी सलग दोन कारवाया करून दारू विक्रेत्यांना इशारा दिला आहे. अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत.

करण्यात आली. या वेळी बल्लूसिंग दरबारसिंग बावरी (वय ४१, रा. पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ, मानवत) याच्याकडून 'भिंगरी संत्रा' देशी दारूच्या १८० मिलीच्या ११ सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची किंमत ८८० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दोन्ही कारवाया गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आल्या असून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आला. या दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास मानवत पोलीस ठाण्यात सुरू आहे.

# पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या पुढाकाराने चारठाणा आंबेडकर नगरला १०० रोहित्र मंजूर

(बाळासाहेब मस्के/ दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा** – चारठाणा येथील आंबेडकर नगरमधील नागरिकांचा वीजेचा प्रश्न अखेर सुटला आहे. राज्यमंत्री तथा पालकमंत्री नामदार मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या आदेशामुळे आंबेडकर नगरसाठी २५ ऐवजी १०० क्षमतेचा नवीन विद्युत रोहित्र मंजूर करण्यात आला आहे.

आंबेडकर नगरमध्ये पूर्वी २५ चा रोहित्र होता. परिसरातील वाढत्या लोकवस्तीमुळे त्यावरचा लोड वाढला होता. त्यामुळे रोहित्र वारंवार जळत होता. यामुळे वीजपुरवठा खंडित होऊन




नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. लोड कमी करण्यासाठी दर्गा परिसरातील रोहित्रावर अतिरिक्त भार टाकला जात होता. त्यामुळे तेथील रोहित्र देखील जळण्याच्या घटना घडत होत्या.

ही समस्या सोडवण्यासाठी भाजपा नेते नानासाहेब राऊत, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, अमोल भवरे, विशाल निकाळजे, उमाजी निकाळजे यांनी पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री तथा ऊर्जामंत्री मेघना दीदी यांनी तात्काळ १०० चा नवीन रोहित्र मंजूर करण्याचे आदेश दिले.

त्यांच्या आदेशानुसार दि. १४ जुलै रोजी परभणी येथील विद्युत भांडारमधून १०० चा रोहित्र वाहनात भरून चारठाणा येथे पाठवण्यात आला. हा नवीन रोहित्र बसविल्यानंतर आंबेडकर नगर, बसस्थानक परिसर आणि दर्गा परिसरातील रोहित्रावरील ताण कमी होणार आहे. त्यामुळे नागरिकांना नियमित आणि खंडित न होणारा वीजपुरवठा मिळणार आहे.

नवीन रोहित्र मंजूर झाल्यामुळे बौद्ध वसाहतीतील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नागरिकांनी पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांचे आभार मानले आहेत.

यावेळी भाजपा नेते नानासाहेब राऊत, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, मतीन तांबोळी, सय्यद मुस्ताक अहमद, वाहन चालक शेख सिद्दिक, शेख नय्युम यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# परभणीत डीआयजी शाहाजी उमाप यांचा जनसंवाद; २२ तक्रारदारांच्या अडचणी ऐकून तातडीच्या कारवाईचे निर्देश

### मालमत्ता वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दखल गुन्हे व अवैध व्यवसायांसह विविध तक्रारींवर अधिकाऱ्यांना सूचना


**परभणी–** नागरिकांच्या तक्रारी समजून घेऊन त्यांचा जलद निपटारा करणे, पोलीस–नागरिक संवाद वाढविणे आणि लोकाभिमुख कामकाजातून जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे या उद्देशाने नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक (डीआयजी) शाहाजी उमाप यांनी सुरू केलेल्या जनसंवाद उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि. १४ जुलै) परभणी येथे तक्रारदारांशी थेट संवाद साधला. यापूर्वी जिल्हा पोलीस दलाच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर दुपारी ३ ते ४.३० या वेळेत जिल्ह्यातील २२ तक्रारदारांनी आपल्या लेखी तक्रारी डीआयजी उमाप यांच्याकडे सादर केल्या. यामध्ये मालमत्ता विषयक वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय आदी विविध प्रकारच्या तक्रारींचा समावेश होता. प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेत डीआयजी शाहाजी उमाप यांनी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत तक्रारींचे तातडीने व योग्य पद्धतीने निराकरण करण्याचे निर्देश दिले. तक्रार निवारण प्रक्रियेला अधिक गती देण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच संवेदना ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. जनसंवादात प्राप्त झालेल्या सर्व तक्रारी संवेदना पोर्टलवर नोंदवून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक प्रकरणाच्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेतला जाणार आहे. या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच परभणी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

# महावितरणचा भोंगळ कारभार उघड; अतिदाबामुळे कोक्कर कॉलनीतील नागरिकांचे मोठे नुकसान;ट्री कटिंगनंतर विद्युत यंत्रणेत बिघाड; टीव्ही, फ्रीज, फॅन, कूलर, चार्जर जळाले

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

**मानवत–** महावितरणच्या हलगर्जीपणाचा फटका पुन्हा एकदा नागरिकांना बसला असून मानवत शहरातील कोक्कर कॉलनी परिसरात मंगळवारी (दि. १४) दुपारी झालेल्या ट्री कटिंगच्या कामानंतर विद्युत वाहिनीत बिघाड होऊन अचानक अतिदाबाचा (हाय व्होल्टेज) पुरवठा झाल्याने अनेक नागरिकांच्या घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू जळून खाक झाल्या. या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून महावितरणच्या भोंगळ कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे २ वाजता महावितरणकडून झाडांच्या फांद्या तोडण्याचे (ट्री कटिंग)



काम सुरू करण्यात आले होते. हे काम सुमारे ३.५० वाजेपर्यंत सुरू होते. काम पूर्ण झाल्यानंतर काही वेळातच विद्युत वाहिनीत बिघाड झाला आणि अचानक मोठ्या प्रमाणात अतिदाबाचा विद्युत पुरवठा सुरू झाला. यामुळे घरगुती उपकरणांमध्ये ठिणग्या उडाल्या, काही उपकरणांतून धूर निघाला तर अनेक उपकरणे पूर्णपणे निकामी झाली.

विशेष म्हणजे या बिघाडामुळे काही ठिकाणी विद्युत खांबातच करंट उतरल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण

> **खांबात करंट, घरात अंधार; जबाबदार कोण?**
> कोक्कर कॉलनीत झालेल्या प्रकारामुळे महावितरणच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. ट्री कटिंगचे काम सुरू असताना आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या होत्या का? विद्युत वाहिनीतील बिघाडाची जबाबदारी कोण घेणार? नागरिकांच्या लाखो रुपयांच्या उपकरणांचे नुकसान भरून देणार कोण? अशा प्रश्नांची उत्तरे महावितरण प्रशासनाने देण्याची गरज निर्माण झाली आहे. नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा बेफिकीर कारभार महत्त्वाचा ठरत असेल तर भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठी दुर्घटना टळल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

या घटनेत रमण देशमाने यांचे दोन फॅन, सागर काळे यांचे टाटा स्काय यंत्र, ज्ञानेश्वर राऊत यांचा टीव्ही व फॅन, गणेश पवार यांचा मोबाईल चार्जर, अरुण गोलाईत यांचा ई–बाईक चार्जर व कूलर, संजय दहे यांचा फ्रीज व फॅन, नागनाथ रेडेवाड, मुन्ना गौंडगे, रवी हजारे, गणेश पुंड, अरुण घुले आणि अविनाश दिशागत यांचे टीव्ही, लखन काळे यांचा फॅन, कृष्णा काळे व नारायण रेडेवाड यांचे मिक्सर, विष्णू रेडेवाड यांचा कूलर, अमोल राऊत यांचा कूलर, मारोती रोडे यांचा टीव्ही तसेच नारायण रोडे यांचे मिक्सर व फॅन, मनोज उगले यांचे दोन फॅन आदी उपकरणांचे नुकसान झाले आहे.

नुकसानग्रस्त नागरिकांनी महावितरण कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता काही कर्मचाऱ्यांकडून उद्धट उत्तरे मिळाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे आधी आर्थिक फटका आणि त्यानंतर अधिकाऱ्यांची असंवेदनशील वागणूक यामुळे नागरिकांचा संताप आणखी वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी या घटनेची तातडीने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, सर्व नुकसानग्रस्तांना पंचनाम्यानुसार नुकसानभरपाई द्यावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विद्युत यंत्रणेची तांत्रिक तपासणी करावी, अशी मागणी केली आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao